संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# नोटबंदी, काळा पैसा आणि निवडणुका

**निश्चलीकरण** म्हणजेच नोटबंदीनंतरची ही पहिली लोकसभा निवडणुक आहे. निवडणूक म्हटल्यानंतर काळ्या पैशाचा वापर हे समीकरण अगदी जोडले गेले आहे. दिवसातला काळा पैसा नष्ट व्हावा. बनावट नोटांचे प्रकार थांबावेत. अशा दोन मुख्य कारणांसाठी तीन वर्षापूर्वी निश्चलीकरण म्हणजेच नोटबंदीचा निर्णय लागू केला गेला. पाचशे आणि हजाराच्या नोटा चलनातून काढल्या गेल्या. त्यावेळी लोकांनी या निर्णयाचे अक्षरशः उत्स्फूर्त स्वागत केले. कारण काळ्या पैशाचा किंवा ज्याला नंबर दोनचा पैसा म्हटले जाते. अशा रकमांचा प्रचंड धुमकूळ सुरू होता. त्याला लगाम घालण्यासाठीचा हा प्रभावी उपाय असल्याचे पटवून दिले गेले. परंतु आता जी परिस्थिती हळुहळू समोर येत आहे त्यावरून नोटबंदीचे मुळ उद्दीष्ट सिध्द झालेले दिसत नाही. एवढेच नव्हे तर अगदी अलीकडे प्रसिध्द झालेल्या माहितीप्रमाणे ज्या दिवशी नोटबंदीचा निर्णय घेतला गेला. त्या आधी रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळात चर्चाही झाली होती. हा निर्णय घोषित करण्याच्या तीन तास आधी रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाने नोटबंदीमुळे काळा पैसा नाहीसा होण्याची शक्यता नाही असेस्पष्टपणे बजावले होते. कारण हा काळा पैसा रोख स्वरुपात फार कमी प्रमाणात असतो. तो बांधकाम क्षेत्र किंवा वेगवेगळ्या मालमत्तांमध्ये गुंतवला जातो. परिणामी या नोटबंदीतून अपेक्षित ते उद्दीष्ट गाठता येईल असे वाटत नाही, असे मत संचालक मंडळाने व्यक्त केले होते. एवढेच नव्हे तर बनावट नोटांच्या बाबतही रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाने फारसा सकारात्मक प्रतिसाद दिलेला नव्हता. या संचालक मंडळाने म्हटले होते की एकूण चलनामध्ये केवळ चारशे कोटींच्याच बनावट नोटा आहेत. आणि हे प्रमाण तसे नगण्य ठरते. अशा नोटांचा बंदोबस्त इतर मार्गांनी करता येऊ शकेल. त्यासाठी निश्चलीकरण हा उपाय तितका साहाय्यभूत ठरणार नाही. आज तीन वर्षानंतर या गोष्टींची सत्यता समोर येताना दिसते. मधल्या काळात झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये काळ्या पैशाचा वापर झालाच आणि आता होत असलेली लोकसभा निवडणुकीतही त्याचा प्रभाव कायम राहील असेच एकूण चित्र दिसते.

### मालमत्तांमध्ये गुंतवणूक

रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाने निश्चलीकरणाला अनुकुलता दर्शवली नसतानाही नोटबंदीचा निर्णय घेतला गेला. फक्त यामधून अनेक आर्थिक व्यवहारांमधून रोख रकमेऐवजी डिजीटल किंवा ईलेक्ट्रॉनिक पध्दतीने पैसा वापरला गेला. अशा डिजीटल व्यवहाराला नोटबंदीमुळे सर्वाधिक चालना मिळाली ही बाब नंतरच्या काळात रिझर्व्ह बँकेने मान्य केली आहे. अर्थातच चलनातून रद्द केल्या गेलेल्या नोटांचे प्रमाण आणि रिझर्व्ह बँकेकडे जमा झालेल्या नोटांचे प्रमाण यामध्ये केवळ दहा हजार कोटींचाच फरक आढळून आला आहे. निश्चलीकरण झाल्यानंतर जवळपास साडेतीन ते चार लाख कोटीचा काळा पैसा उघड होण्याची शक्यता व्यक्त झाली होती. म्हणजेच ज्यांच्याकडे असा काळा पैसा आहे ते वेगवेगळा मार्ग वापरून बँकेमध्ये जमा करतील. अशीदेखील अपेक्षा व्यक्त झाली होती. परंतु तसेही घडून आलेले नाही. याचा अर्थ लोकांनी स्वतःकडचा काळा पैसा वेगवेगळ्या मालमत्तांमध्येच गुंतवला असल्याचे स्पष्ट होते. त्यातही रिअल इस्टेटमधील बांधकाम क्षेत्रात तसेच ज्वेलरी आणि मनोरंजन या क्षेत्रात हा काळा पैसा सर्वाधिक असल्याचे स्पष्ट झाले परंतु राजकीय क्षेत्रातूनसुध्दा हा काळा पैसा पांढरा करून घेण्याचे अनेक प्रयत्न झाल्याचेही समोर आले आहे. नोटबंदीनंतरच्या केवळ दोन वर्षामध्ये या काळ्या पैशाने पुन्हा धुमाकूळ सुरू केला. भ्रष्टाचाराचे किंवा लाचखोरीचे प्रमाण फारसे कमी झालेले नाही. निवडणुकांमधूनही रोख रकमेचा प्रचंड वापर होत आहे. आणि त्याला ही लोकसभा निवडणुकही अपवाद राहाणार नाही. अनेक उमेदवारांच्या गाड्यांमधून रोख रकमांचे म्हणजेच नोटांच्या बंडलांची खोकी जप्त होत असतात. काही राज्यातल्या विधानसभा निवडणुकांमध्ये अशा रोख रकमा सापडल्याचे बरेच प्रकार घडले. यावरून राजकारणातला काळा पैसा पुन्हा पूर्वीसारखाच डेरेदाखल झाला आहे असा त्याचा निष्कर्ष निघतो. ज्या धाडसाने निश्चलीकरणाचा निर्णय घेतला गेला लोकांनीदेखील मोठ्या उत्साहात त्याचे स्वागत केले होते. नंतर त्याचा प्रचंड त्रासही सहन केला आणि आता मात्र ज्या कारणासाठी हा उपद्व्याप केला गेला होता त्याचे अपेक्षित परिणाम साधले गेले नसल्याचे निष्कर्ष रिझर्व्ह बँकेकडून काढला जात आहे.

### दहशतवादी हल्लेही वाढले

नोटाबंदीमागचे आणखी एक कारण सांगितले गेले होते की बनावट नोटांचा वापर केला जातो आणि ते आपल्या दहशतवादी कारवाया वाढवत राहातात. पाचशे आणि हजाराच्या नोटा रद्द केल्यानंतर दहशतवादालाही तडाखा बसेल अशी एक समजूत केली गेली. परंतु ते उद्दीष्टही साध्य झालेले नाही. नोटबंदीनंतर पहिले सहा सात महिने दहशतवादी कारवाया नियंत्रित झाल्या होत्या. पण नंतरच्या वर्षात या दहशतवादाने अशी उसळी मारली की ऊरी, पठाणकोट, इथल्या लष्करी तळांवरच्या हल्ल्यानंतर पुलवामाचाही मोठा हल्ला दहशतवाद्यांनी घडवून आणला. शिवाय जम्मू काश्मीरमध्ये त्याच्या कारवायांमध्येदेखील वाढ झाल्याचेच दिसून आले. जर या निश्चलीकरणाच्या प्रभावाची किंवा परिणामांची कारणमिमांसा एवढ्यासाठीच महत्वाची ठरते. ही रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाने नोटबंदीला अनुकुलता दर्शवली नव्हती तरीसुध्दा ती केली गेली. शिवाय आता लोकसभा निवडणुकीतही तोच काळा पैसा आपला प्रभाव दाखवण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. वेगवेगळ्या स्वरुपामध्ये काळा पैसा गुंतवला जातो आणि नंतर त्याचा वापरही केला जातो ही त्यातली महत्त्वाची बाब आहे. काळ्या पैशाचा भारतीय चलनावर असलेला प्रभाव नाहीसा करायचा असेल तर राजकीय क्षेत्रामध्ये तसे मनोरंजन क्षेत्रामध्ये त्याचा होणारा वापर रोखावा लागेल. नोटबंदी हा काही उपाय ठरत नाही.